# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई

जा.क्र.मप्रनि/आस्था/ब- ६.३
कल्पतरु पॉईंट, २ रा मजला,
सायन-माटुंगा स्किम रोड क्र. ८,
सायन सर्कल समोर, सायन (पूर्व),
मुंबई- ४०० ०२२

दिनांक: ८ / ७ /२०१३

## कार्यालयीन आदेश क्रमांक ई - ८ /२०१३

मंडळातील संमतीपत्र मुल्यांकन समिती/संमतीपत्र समिती (CAC/CC) पुढे सादर होणाऱ्या विविध प्रकारच्या प्रकरणांचे समितीपुढे सादरीकरण व मान्यता घेण्याच्या संदर्भातील कार्यवाही तसेच मान्यतेनंतर सदर प्रकरणे इंटरनेटवर सादर करण्याबाबत एक स्वतंत्र कक्ष स्थापन करण्याचा प्रस्ताव विचाराधीन होता. सदर कक्षाच्या कार्यक्षेत्रामध्ये कोणत्या प्रकारचे कामकाज असेल, तसेच सदर कक्षामध्ये कोणत्या-कोणत्या सुधारणा अपेक्षित आहेत, याबाबतचे आदेश वेळोवेळी निर्गमित करण्यात येतील, परंतु तत्वत: सदर कक्ष स्थापन करण्यास मान्यता देण्यात येत असून, तूर्तास सदर कक्षाची संरचना खालीलप्रमाणे असेल.

१. सदर कक्ष मुख्यालयातील एका विभागप्रमुखांच्या अधिपत्याखाली कार्यरत असेल
२. या कक्षामध्ये ३ क्षेत्र अधिकाऱ्यांचा समावेश असेल.
३. या कक्षामध्ये एका कनिष्ठ लिपिक/टंकलेखकाचा समावेश असेल.
४. या कक्षामध्ये कार्यरत असलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांचे आदेश स्वतंत्ररित्या निर्गमित करण्यात येतील.

उपरोक्त कक्षाकडून खालीलप्रमाणे कामकाज अपेक्षित आहे.

१. संमतीपत्र मुल्यांकन समिती/ संमतीपत्र समितीपुढे सादर होणा-या प्रकरणांचे कार्यवृत्त सादर करणे
२. संमतीपत्र मुल्यांकन समिती/ संमतीपत्र समितीचे इतिवृत्त मंजूरीसाठी सादर करणे
३. संमतीपत्र मुल्यांकन समिती/ संमतीपत्र समितीचे इतिवृत्त मंडळाच्या संकेतस्थळावर प्रसारीत करणे
४. सर्व प्रलंबित प्रकरणांचा आढावा समितीपुढे सादर करणे
५. संमतीपत्र मुल्यांकन समिती/ संमतीपत्र समितीसंबंधीत सदस्य सचिव यांनी आदेशित केलेले इतर कामकाज करणे

सदर आदेश त्वरीत अंमलात येत आहेत.

( राजीव कुमार मित्तल, भा.प्र.से.)
सदस्य सचिव

प्रति,

१. प्रधान वैज्ञानिक अधिकारी/जल प्रदूषण निवारण अभियंता/हवा प्रदूषण निवारण अभियंता
२. सहायक सचिव (तांत्रिक)मुख्य लेखा अधिकारी, मुंबई/वरिष्ठ विधी अधिकारी, विधी व योजना विभाग-१
३. वरिष्ठ वैज्ञानिक अधिकारी,मध्यवर्ती प्रयोगशाळा,निर्मलभवन,महापे, नवी मुंबई/नागपूर
४. वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी/कार्यकारी अभियंता
५. प्रादेशिक अधिकारी, मुख्यालय/पाम्स विभाग/मुंबई/ठाणे/कल्याण/रायगड/नवीमुंबई/ पुणे/नाशिक/नागपूर/औरंगाबाद/कोल्हापूर/अमरावती/चंद्रपूर